# कुलाबा ते सिप्झ भुयारी मेट्रो-३

# बोगद्याच्या कामाला सुरुवात

■ मुंबई,

मुंबईतील भुयारी मेट्रो ३ च्या कामाला म्हणजे बोगदे बनवण्याच्या कामाला आजपासून सुरुवात झाली आहे. मेट्रो ३ चा मार्ग कुलाबा ते सीप्झ असा ३३ किमीचा भुयारी मार्ग असणार आहे. जमिनीपासून सुमारे २५ मीटर खोलीवर या मेट्रोचा मार्ग असणार आहे. यासाठी आत्तापर्यंत ३ भुयारी मार्ग तयार करणारे टनेल बोअरिंग मशिन्स हे जमिनीखाली उतरवण्यात आले आहेत. यापैकी माहीमच्या नयानगर इथल्या मशीनने आज प्रत्यक्ष बोगदे बनवण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. माहीमच्या भागातील हे मशीन दादर शिवाजी पार्कपर्यंत भूमिगत बोगदे बनवण्याचे काम करणार आहे.

एकूण १७ अवाढव्य टनेल बोअरिंग मशिन्स ही जमिनीखाली बोगदे बनवण्याचे काम पुढील २ वर्षे करणार आहेत. मेट्रो ३ चा मार्ग २०२१- २२ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असल्याचे हा प्रकल्प राबवणाऱ्या एमएमआरडीएच्या मुंबई मेट्रो रेल विकास कॉर्पोरेशनने सांगितले आहे. मेट्रो ३ मार्गामुळे कफ परेड, नरिमन पॉईंट, काळबादेवी, वरळी, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, सीपझ ही आर्थिक उलाढालीची केंद्र जोडली जाणार आहेत. तर रेल्वेने जोडली न गेलेली वरळी, प्रभादेवी, धारावी, कलिना, विमानतळसारखे भाग जोडले . जाणार आहेत. तसंच सीएसटी, चर्चगेट, दादर सारखी रेल्वे स्टेशन्स मेट्रोने जोडली जाणार आहेत.